संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ८८३/२०१४
महाराष्ट्र सरकार –वि– सुभाष
निशाणी क्र. १६

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०२

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नावः फारुक

वडीलांचे नावः युसुफ

आडनावः शेख

माझे वयः ४४ वर्ष, व्यवसायः टेलरींग,

राहणारः केदारखेडा, ता. भोकरदन, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

०१. मी दि. ०४/०८/२०१४ रोजी मौजे देऊळगांव येथे राहण्यास होतो परंतु माझा व्यवसाय मी केदारखेडा येथे करत होतो. मी केदारखेडा येथून देऊळगांव येथून ये–जा करत होतो. घटना दि. ०४/०८/२०१४ रोजी सकाळी ०९.३० ते १०.०० वाजण्याच्या सुमारास घडली. त्यावेळी मी, ज्ञानेश्वर वाघमारे, मधुकर वाघमारे, प्रभाकर वाघमारे असे केदारखेडा येथे जाण्यासाठी बाणेगांव फाटा येथे उभे होतो. त्यावेळी एक दुधाचा टँकर राजूरहून भोकरदनच्या दिशेने आला व त्या टँकरने ज्ञानेश्वर वाघमारे याला धडक दिली. ज्ञानेश्वर वाघमारे याला छातीस व डोक्याला मार लागला. धडक देणारा टेम्पो तेथे थांबला नाही. धडक देणा–या टेम्पोचा क्र. एमएच.२८ बी.९९६३ असा होता. मधुकर वाघमारे हे ज्ञानेश्वर वाघमारे यांना जालना येथे दवाखान्यात घेऊन गेले. मला आरोपी टेम्पो चालवत असल्याचे पुन्हा समजले.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. ठोंबरे यांच्याकडून**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी व ज्ञानेश्वर चांगले मित्र आहोत. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनास्थळी हॉटेल व दुकाने होती. हे म्हणणे खरे नाही की, लोक आजूबाजूच्या शेतात काम करत होते. मी माझा जबाब वाचून पाहिला होता का कसे हे माझ्या लक्षात नाही. मी तथाकथित घटनेवेळी गाडीचा क्रमांक पाहिला होता. हे माझ्या आत्ता लक्षात नाही की, मी पोलीसांना गाडीचा क्रमांक पाहिल्याचे सांगितले होते अगर कसे? माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ मी पोलीसांना सांगितला होता अगर कसे हे मला

आजरोजी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमूद घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा मित्र असल्याने मी त्याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/-

दिनांकः १८.०७.२०२५

(मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन